# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Economics

## Assignment

## Session: 2019 – 2020

नाव: प्रिया भाऊरावजी नेवारे

class - B.A II Year 4th sem

Sub - Eoconomics

2019-20

Principal
Ashoka Girls Arts & Commerce
College Bach Nagar, Nagpur-15

Dr. M. D. Katre

SEAL

① व्यापारी बँक अर्थ व व्याख्या कार्य निर्मिती

व्याख्या - "बँक" हा शब्द आपण चांगलाच परिचयाचा असला तरी त्याची निश्चित व्याख्या करणे कठिण आहे. अर्थशास्त्रात बँक या शब्दाच्या अनेक व्याख्या करण्यात आलेल्या आहेत. परंतु असुनही आज कोणालाही सर्वमान्य व्याख्या देण्यात यश आलेले नाही. बँकांची कार्ये लक्षात घेऊन विविध तज्ञांनी व्याख्या दिल्या आहेत. काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(i) वाल्टरलीफ :- "बँक म्हणजे अशी व्यक्ती किंवा संस्था की, जी लोकांच्या ठेवी स्वीकारते व मागितल्या असता त्यांना त्या परत करते.

(ii) एच. एच. हार्ट :- "बँक म्हणजे अशी व्यक्ती की, जी दैनंदिन व्यवहारात लोकांकडून चालू खात्यावर पैसा स्वीकारते व त्यांनी जसा पैसा ठेवला आहे त्यांच्या धनादेशाने (चेकने) स्वीकारते.

SEAL

(iii) किनले " बँक ही अशी संस्था असते की; जी गरजू लोकांना सुरक्षिततेचा विचार करून रकमा कर्जाऊ देते व निव्याजवर लोक आपणाकडील पैसा जमा ठेवतात "

(iv) भारतीय बँकींग कंपनी कायदा १९४९ " कर्ज म्हणून देण्याकरिता किंवा भांडवल म्हणून गुंतविण्यासाठी लोकांकडून मागताक्षणी किंवा इतर प्रकारे परत करावयाच्या किंवा चेक्स ड्राफ्ट्स, ऑर्डर किंवा इतर प्रकारे काढून घ्यावयाच्या अटीवर, ठेवी ~~स्वीकारण~~ स्वीकारणाऱ्या संस्थांना बँक म्हणतात. "

थोडक्यात, ठेवीच्या रूपाने लोकांकडून पैसे स्वीकारणे, हे पैसे गरजू लोकांना कर्ज देणे अशी प्राथमिक कार्ये करणाऱ्या संस्थेला बँक म्हणतात. वरील व्याख्यांपैकी कोणतीही व्याख्या परिपूर्ण नसून त्यातून बँकेच्या कार्याचा परिचय मात्र मिळत नाही कारण वरील कार्यांशिवाय व्यापारी बँका इतर ~~सर्व~~ अनेक कार्य करतात. थोडक्यात, व्यापारी

उद्देशाने ज्या संस्था ठेवी स्वीकारण्याचे व कर्ज देण्याचे प्राथमिक कार्य करतात त्या आर्थिक संस्थांना व्यापारी बँका म्हणतात. बँकांचे त्यांच्या कार्याच्या विशेषीकरणावरून असे विविध प्रकार केले जातात. (i) व्यापारी बँका (ii) बचत बँका (iii) सहकारी बँका (iv) विनिमय बँका (v) औद्योगिक बँका (vi) कृषी बँका (vii) मध्यवर्ती बँक (viii) जागतिक बँक इत्यादी.

## व्यापारी बँकांची कार्ये (Functions of Commercial Banks)

व्यापारी बँकांचे अर्थव्यवस्थेतील स्थान अत्यंत महत्त्वाचे असते म्हणून त्यांना अर्थव्यवस्थेच्या रक्तवाहिन्या म्हणजे ज्या प्रकारे रक्तवाहिन्यांद्वारे शरीराच्या सर्व भागात योग्य रक्तपुरवठा होऊन शरीर निरोगी राहते तसेच देशाची आर्थिक वाढ नीट राहावी यासाठी व्यापारी बँका कार्य करतात. व्यापारी बँका त्यांच्याकडे जमा झालेल्या ठेवी जेथे आवश्यकता आहे तेथे

SEAL

पैशाच्या विनिमयाचे कार्य करतात. शिवाय त्या गरजू व्यक्तींना मदत करतात. तसेच त्या दिर्घ मुदती कर्ज देऊन देशाच्या विकासाला हातभार लावतात. बँकांकडून शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक इत्यादी क्षेत्रांच्या ~~आर्थिक~~ भांडवलविषयक गरजा पूर्ण होतात. बँकांकडे लोकांना बचतीची सवय लागते, देशात भांडवलसंचय होतो. थोडक्यात, आधुनिक काळात राष्ट्राच्या आर्थिक विकासात बँकांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. भारताच्या आर्थिक विकासातही व्यापारी बँका महत्त्वाची भूमिका बजावीत आहेत. व्यापारी बँकांच्या कार्यांचे दोन प्रकार केले जातात.

(1) प्राथमिक कार्ये

ii) दुय्यम कार्य

ज्या कारणांसाठी व्यापारी बँक स्थापन करण्यात आली आहे. आणि जी कार्ये केल्याशिवाय त्या संस्थेला बँक म्हणून मान्यता देता येत नाही. अशा प्रकारच्या कार्यांना प्राथमिक कार्ये म्हणतात. ग्राहकांना विविध प्रकारच्या ठेवी उपलब्ध करून

ठेवीसाठी ज्या कार्ये बँकांकडे पार पाडली जातात त्या कार्यांचा समावेश दुय्यम कार्यात केला जातो.

प्राथमिक कार्यात प्रामुख्याने
(i) ठेवी स्वीकारणे (ii) कर्ज देणे यांचा समावेश होतो. तर दुय्यम कार्यात
(i) हुंडी वटविणे (ii) ठेवी पाठविणे
(iii) मौल्यवान वस्तु सांभाळणे
(iv) प्रवासी चेक देणे
(v) विश्वस्त म्हणून कार्य करणे
(vi) क्रेडिट कार्डची सोय.
(vii) ATM ची सुविधा
(viii) पत पैसा निर्मिती.

(1) प्राथमिक कार्ये (Primary Functions)

(i) ठेवी स्वीकारणे :- व्यापारी बँकांच्या कार्यातील अत्यंत महत्त्वाचे कार्य म्हणजे ठेवी स्वीकारणे होय. ठेवी स्वीकारण्याच्या उद्देशानेच त्यांची स्थापना झालेली असते. लोकांनी आपणाकडील जास्तीचे उत्पन्न विशिष्ट काळासाठी बँकेत ठेवतात. त्या रकमेस ठेवी (उत्पन्न) ठेवी म्हणतात.

i) व्यापारी बँका लोकांकडून ठेवी
स्वीकारणे, त्या सुरक्षित ठेवणे,
मागताक्षणी त्या परत करणे शिवाय
त्यावर व्याज देणे ही कार्ये
करतात. प्रश्न असा आहे की
की लोक बँकेत ठेवी का ठेवतात
व व्यापारी बँका त्यावर व्याज
देऊन त्या का स्वीकारतात?
त्यातील पहिल्या प्रश्नाचे उत्तर
असे की लोक बँकेत ठेवी
ठेवतात ते तीन हेतुसाठी
- (i) रोखता (ii) अधिक उत्पन्न प्राप्ती
iii) सुरक्षितता.

(i) यातील रोखता
म्हणजे ठेवींचे रोख पैशात
रूपांतर होय. या अर्थाने ठेवीत
मोठ्या प्रमाणात रोखता असते.
ii) दुसरे म्हणजे बँका ठेवीवर
ठेवीदाराला व्यापारी बँका व्याज
देतात. हे व्याज म्हणजे ठेवीवर
प्रतिफल उत्पन्न होय.

iii) बँकेतील ठेवीत सुरक्षितता असते.
शिवाय व्यापारी बँका व्याज
देतात. ठेवीदारांना ठेवीदाराच्या

ठेव, सांभाळण्याची हमी देतात.
त्यामुळे चोरी, लुट, धोका,
फसवेगिरी यांपासुन फसवेगिरी यांपासुन
ठेवीतील पैसा सुरक्षीत राहतो.
दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तर असे की
व्यापारी बँका व्याज देऊन ठेवी
का स्विकारतात याचे कारण त्या
त्याच्याकडील ठेवीवर पतपैशाची
निर्मिती करतात. व त्यावर व्याज
मिळवितात. व्यापारी बँका ज्या
ठेवी स्विकारतात त्या ठेवीच्या
कालानुसार व स्वरूपानुसार भिन्न
प्रकार केले जातात.
(I) चालु ठेवी
ii) बचत ठेवी
iii) मुदती ठेवी
iv) आवर्ती ठेवी.

(I) चालु ठेवी (Current Deposits)
: चालु ठेवीत ठेवीदार
आपल्याकडील वाटेल तेवढी रक्कम
वाटेल तव्हा ठेवु शकतो व वाटेल
तव्हा तो रक्कम काढु शकतो. म्हणुन
ह्या खात्याला चालु खाते असेही
म्हणतात. त्याशा ठेवीवर व्यापारी
बँका अत्यंत अल्प व्याज देतात.

कारण हे आहेत बँकेच्या दृष्टीने फारसे फायद्याचे नसते. व्यापारी बँकेला या ठेवीतील रक्कम मागताक्षणी परत करावी लागते. म्हणून या ठेवींना मागणी ठेवी असेही म्हणतात.

ii) बचत ठेवी (Saving Deposits)

बचत ठेवीत ठेवीदार आपल्याकडील ठराविक रक्कम नेहमीसाठी ठेवावी लागते. शिवाय या खात्यातील रक्कम ठेवीदार आठवड्यातून दोनपेक्षा जास्त वेळा काढू शकत नाही. अशा ठेवीवर दिलेली रक्कम मागताक्षणी परत करावी लागते. दिले जाणारे व्याज चालू ठेवीपेक्षा जास्त असते.

iii) ~~मुद~~ मुदती ठेवी (Fixed Deposits)

ज्या ठेवी ठराविक काळासाठी (सहा महिने, वर्ष, दोन वर्षे, तीन वर्षे, पाच वर्षे, दहा वर्षे इत्यादी) ठेवल्या जातात त्या ठेवींना मुदती ठेवी म्हणतात.

मुदती ठेवीच्या काळ ठेवीदाराला निश्चित करावा लागतो. ह्या ठेवीवर मिळणारे व्याज ठेवींच्या इतर सर्व प्रकारांपेक्षा जास्त असते तसेच ठेवीच्या काळ जेवढा मिळणारे व्याज जास्त असते. व हा काळ जेवढा कमी तेवढे मिळणारे व्याज कमी असते. ह्या ठेवीतील पैसा व्यापारी बँका कर्ज देऊन व्यापारी बँका त्याद्वारे उत्पन्न मिळवितात. म्हणून मुदती ठेवी ह्या व्यापारी बँकेचे उत्पन्न कमाविण्याचे उत्तम साधन असते. ठेवींची मुदत संपण्यापूर्वी ठेवीदाराला रकमेची गरज असली तर या ठेवीवर ठेवीदाराला कर्ज मिळू शकते.

iv) आवर्ती ठेवी (Recurring Deposits)

समाजातील मध्यमवर्गीय लोकांना आकर्षित करण्यासाठी अनेक बँकांनी आवर्ती ठेवी हा प्रकार सुरू केला आहे. या खात्यात विशिष्ट काळात (दरमहा / दररोज) ठराविक रक्कम नियमित

भरावी लागेल. ही रक्कम विशिष्ट काळात भरली जाते. मुदत संपल्यावर ठेवीदारास व्याजासह रक्कम परत मिळते. ह्या खात्यात एक रकमी ठेवावी लागत नाही. त्यामुळे ती सामान्य सोयीची असते. ह्या ठेवीचा काळ एक वर्षापर्यंत असतो.

(2) कर्ज देणे : व्यापारी बँकांच्या प्रमुख कार्यापैकी दुसरे कार्य म्हणजे कर्ज देणे हे होय. व्यापारी बँका लोकांकडून जमा केलेल्या ठेवीतून गरजू व्यक्तीना ~~कर्ज~~ कर्ज मागितले असता कर्ज देतात. कारण बँक लोकांच्या ठेवीवर व्याज देते. शिवाय बँकेला प्रशासकीय खर्च करावा लागतो. भागधारकांना लाभांश देण्यासाठी बँकेला व्याजाच्या रूपाने उत्पन्न मिळवावे लागते. नफा मिळविणे हा बँकेचा उद्देश असतो. त्यासाठी त्यांना कर्ज द्यावे लागते. कर्ज देताना बँक कर्ज घेणाऱ्या व्यक्तीचे,

कर्ज घेण्याचा उद्देश कर्जदाराची पत, कर्जाची मुदत, व्याजदर, तारण ह्या सर्व गोष्टींचा कालावधी ध्यान. व्यापारी बँका जी कर्जे देतात त्यांच्या मागणी मुदतीनुसार प्रकार केले जातात.

(1) मागणी कर्ज :- अशी कर्जे मागितली असता परत करावी लागतात. व्यापारी, कारखानदार, सोना अशा कर्जाची आवश्यकता असते. अशी कर्जे प्रामुख्याने ऋणदाराच्या धंदेवर दिली जातात. कर्ज मंजूर झाल्यावर ती रक्कम कर्जदाराच्या खात्यावर जमा केली जाते. अशी कर्जे प्रामुख्याने व्यापारी सट्टेबाज उद्योजक व्यक्ती घेतात. सामान्य रोख कर्ज (cash credit) असेही म्हणतात.

अल्प मुदती कर्ज :- ज्या कर्जाचा काळ जास्तीत जास्त एक वर्ष असतो. अशी कर्जे व्यापारी - व्यापारासाठी तर शेतकरी पिकासाठी पीक कर्ज म्हणून घेतात.

यासाठी सुद्धा कर्जदाराला कर्जापेक्षा तारण द्यावे लागते.

iii) **मध्यम मुदती कर्ज :-** ज्या कर्जाचा काळ एक वर्षापेक्षा जास्त व जास्तीत जास्त तीन वर्ष असतो. त्या कर्जांना मध्यम मुदती कर्ज म्हणतात. ह्या कर्जावरील व्याजदर अल्प मुदती कर्जापेक्षा कमी असतो.

iv) **दिर्घ मुदती कर्ज :-** कर्जाची आणखी एक प्रकार म्हणजे दिर्घ मुदती कर्ज हा होय. असा कर्जाचा काळ साधारणपणे पाच वर्षापेक्षा जास्त असतो. ह्या कर्जावरील व्याजाचा दर इतर कर्जप्रकारापेक्षा कमी असतो. व्यापारी बँका अशी कर्जे कमी वाटप करतात. कारण ही कर्जे दिर्घकाळानंतर परत मिळणारी असतात. थोडक्यात व्यापारी बँका कर्ज वाटप करताना कर्जाचे तारण, व्याजदर, व्याज रक्कम निश्चित करतात. कर्जदार जेव्हा कर्जाच्या सर्व अटी मान्य करतो. तेव्हा ती रक्कम कर्जदाराच्या खात्यात जमा केली जाते. रोख दिली जात नाही.

त्यामुळे व्यापारी बँका जे कर्ज देतात ते कर्जदाराच्या नावाने ठेवीच्या स्वरूपात जमा करून देत असतात. थोडक्यात, कर्ज म्हणजे संपत्ती (की दायित्वाचे) ठेवीमध्ये केलेले रूपांतर होय असे म्हटले जाते.

व्यापारी बँकेच्या कर्ज वाटपातून व्यक्तीच्या विकासाला, उत्पादन, उत्पन्न, रोजगार, व्यापार वाढण्यास मदत होते. थोडक्यात व्यापारी बँकांची कर्जे देशाच्या विकासाचे महत्त्वाचे साधन होय. कर्जाचा विशेष लाभ करण्यासाठी कर्ज पाहिजे त्यासाठी ते घेतले जाते. नसता कर्ज हे ओझे ठरते हे लक्षात घ्यावे.

ब) दुय्यम कार्ये (Secondary Functions)

1) हुंड्या वटविणे :-
2) पैसे पाठविणे
3) मौल्यवान वस्तू सांभाळणे.
4) प्रवासी चेक
5) विश्वस्त म्हणून कार्य करणे
6) गुंतवणूक
7) खरेदी - विक्री व्यवहार

8) एटी. एम ची सोय
9) पत कार्ड
10) पतपेढीची निर्मिती

11) हुंड्या वटविणे (Secondary)
व्यापारी बँकांच्या
मुख्य कार्यात त्याचा उल्लेख केला जातो ते म्हणजे हुंड्या वटविणे हे होय. हुंडी म्हणजे एका व्यापाऱ्याने दुसऱ्या व्यापाऱ्याकडून घेतलेल्या वस्तूबद्दल लिहून दिलेली वचनचिठ्ठी किंवा करारपत्र होय. अशा वचनचिठ्ठ्या किंवा हुंड्या घेऊन व्यापारी जेव्हा त्याच्या व्यापारी बँकेत जातो तेव्हा व्यापारी बँक या हुंड्या स्वीकारून व्यापाऱ्याला कमिशन वजा करून बाकी रक्कम रोख स्वरूपात देते. यालाच हुंडीचे वटणे म्हणतात या व्यवहारात व्यापाऱ्याला करणेच्या पेढी रोख पैसा मिळतो तर बँकेला कमिशन मिळते. अशाप्रकार हुंड्यांच्या वटनातून बँकेला उत्पन्न मिळते सामान्यपणे देशांतर्गत हुंडी मुदत जवळ दिवसांची असते तर आंतरराष्ट्रीय हुंडीची मुदत 120 दिवसांची असते.

हुंड्या म्हणजे व्यापारी बँकांनी दिलेले ~~अल्प~~ अल्प मुदती कर्ज होय.

ii) **पैसा पाठविणे :-** व्यापारी बँका लोकांच्या व्यापारासाठी किंवा सामान्य कामासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पैसा पाठविण्याचे काम करतात. असे पैसे त्या धनादेश किंवा ड्राफ्टच्या मदतीने पाठवीत असतात. असे पैसे पाठविल्याने अर्थात खात्री असते व त्यात सुरक्षितता असते. पैसे पाठविणाऱ्या व्यक्तीकडून त्या बँका कमिशन घेतात ते त्यांचे उत्पन्न असते. संगणकाच्या मदतीने तर हे पैसे एका दिवसात सुद्धा संबंधिताला मिळू शकतात.

iii) **मौल्यवान वस्तू सांभाळणे :-** प्रत्येक व्यक्तीजवळ काही महत्त्वाची कागदपत्रे, मौल्यवान वस्तू - सोने, दागिने, चांदी असतात. ह्या वस्तू चोरीस गेल्यास व्यक्तीचे नुकसान होते. बँक या वस्तूंच्या सुरक्षिततेची हमी स्वीकारून अशा वस्तू सुरक्षित ठेवण्यासाठी बँका ग्राहकाला सुरक्षित करण्याची

सुविधा (Safe Deposit vaults)
उपलब्ध करून देतात. ग्राहक
त्याच्याकडील मौल्यवान वस्तू सुरक्षित करण्याचा हेतू असतो
कुलूप ठेवले याची चौकशी
बँक करीत नाही. आवश्यकतेनुसार
गरज पडल्यास केव्हाही सुरक्षित
कुलूपात ठेवलेली वस्तू नो काढू
शकतो. सुरक्षित कप्प्याच्या आकारानुसार
भाडे आकारले जाते. सुरक्षित
कप्प्याची एक चावी ग्राहकाकडे
तर दुसरी बँकेकडे असते.
याचाच अर्थ दोन चाव्यांशिवाय
उघडताही येत नाही. व बँकही उघडता
येत नाही मोठ्या शहरात ही
सोय लोकप्रिय आहे.

v) प्रवासी चेक :- आजच्या काळात
रोख पैसे सोबत बाळगून प्रवास
करणे अत्यंत जोखमीचे काम
आहे प्रवाशांची ही अडचण
लक्षात घेऊन व्यापारी बँकांनी
(प्रवासी बँकांना) (प्रवासी चेक
ची पद्धती सुरू केली या
पद्धतीनुसार प्रवासी रिकामे करून
बँक जमा करा

त्या रकमेचे भिन्न चेक व्यापारी
बँका त्यार व्यक्तीस देते. तो
प्रवासी ते चेक देशातील त्या
बँकेच्या शाखेत जेव्हा सादर
करतो तेव्हा ती बँक त्याला तेवढे
पैसे रोख देते. यामुळे प्रवाशास
गरजेपेक्षा जास्त पैसा रोख
बाळगण्याची गरज नसते.

(v) विश्वस्त म्हणून कार्य करणे :-

अनेकदा
व्यापारी बँका विश्वस्त म्हणून नेमले
जाते. ~~वारस जोपर्यंत सज्ञान~~
असेल कार्य करतात. व्यक्ती
मृत्युनंतर आपली मालमत्ता आपल्या
वारसांनाच मिळावी या हेतुने
मालमत्तेची सांभाळणूक करण्यासाठी
बँकेला विश्वस्त म्हणून नेमले जाते.
वारस जोपर्यंत सज्ञान असेल
तोपर्यंत बँक त्या व्यक्तीची
मालमत्ता सांभाळते. वारस सज्ञान
झाल्यावर मालमत्ता वारसाच्या ताब्यात
दिली जाते. हे कार्य
करण्यासाठी बँक मोबदला घेत
असते.